

THEMATIC PUBLICATIONS
www.thematicsjournals

ISSN 2320-6263

# RESEARCH ARENA

A MULTI-DISCIPLINARY INTERNATIONAL REFEREED RESEARCH JOURNAL

Vol 1 • Issue 9 • Dec 2013

THEMATICS PUBLICATIONS • www.thematicsjournals.org

S. S. Kanade
Editor-in-Chief

दर्शनशास्त्रदृष्या संसारस्य रचनाया: मूलतत्त्वानि
**सुमन रानी**
86 - 87

भ्रूण-हत्या के रुप में जीवन के मानवाधिकार से वंचित होती बच्चियाँ
**प्रेमलता**
88 - 92

छत्तीसगढ़ मे ग्रामीण गरीबी एवं आर्थिक सुधार एक अध्ययन
**प्रभात कुमार रवि व व्ही. एम. जुर्री**
93 - 95

अन्तर्राष्ट्रीय आतंकवाद और भारतीय राष्ट्रीय सुरक्षा की नई चुनौतियाँ
**के. बी. पाटील**
96 - 98

कालिदास और संगीत
**आशा खरे**
99 - 101

शमशेर बहादुर सिंह काव्य कुछ विचार
**गिता एच. तलवार**
102 - 103

लिंगभाव असमानता आणि समाज वास्तवता
**शोभा संभोजी**
104 - 106

लोकशाही विकेंद्रीकरण आणि ग्रामसभेची भूमिका
**भुषण हिरामण पाटील**
107 - 110

बालकामगार: सामाजिक अध:पत्न
**लता बाबुराव हिवसे**
111 - 113

THEMATICS PUBLICATIONS PVT LTD
www.thematicsjournals.org

RESEARCH ARENA
ISSN 2320-6263
Vol 1. Issue 9. Dec 2013. pp. 104-106.
Paper ID: 80032013169
Available online at http://www.thematicsjournals.org/ResAre
Paper received: 23 Dec 2013. Paper accepted: 30 Dec 2013.

# लिंगभाव असमानता आणि समाज वास्तवता

शोभा संभोजी

**प्रस्तावना:**

समाजातील सर्व व्यक्तीचा दर्जा समान नाही. काहींचा श्रेष्ठ तर काहींचा कनिष्ठ मानला जातो. हा भेदभाव अनेक निकष लावून केला जातो. व्यक्तीच्या लिंगाच्या आधारे श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद केला जातो. लिंगभेद म्हणजेच स्त्री-पुरुष भेद हा नैसर्गिक आहे. निसर्गाने स्त्री-पुरुषांच्या शरीराचा व्यवस्था वेगळी केली आहे. त्यामुळे जननक्षम अवयवांमुळे स्त्रिया शारीरिकदृष्ट्या कमजोर आहेत. सामाजिक जीवनासाठी स्त्री-पुरुष दोघांचे महत्व असताना श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद वास्तववादी नाही.

भारतीय समाजाची पारंपारिकता विचारात घेतल्यास आजही प्रदिर्घ काळापासून स्त्री-पुरुष विषमता अस्तित्वात असल्याचे दिसते. आधुनिकीकरण, जागतिकीकरण, नागरीकरण वर्षापूर्वी स्त्रियांचे होय तेच प्रश्न आजही कायम आहेत. हुंड्याची समस्या, घटस्फोटाची समस्या, बालविवाहाची, विनयभंगाची, लैंगिक शोषणाची समस्या या सर्व समस्यांमध्ये स्त्रियांचीच पिळवणूक होत आहे. आज थोड्याफांर फरकाने हेच घडत आहे.

**समस्येचा उगम:**

भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृती आहे. या संस्कृतीमुळे पुरुषांच्या मानसिकतेप्रमाणे स्त्रियांची मानसिकता ही बदलेली नाही. काही गोष्टी स्त्रिया मोठ्या अभिमानाने सांगत असतात. 'माझ्या नवऱ्याला घराबाहेर गेलेलं आवडतं नाही', अमुक रंगाची साडी घातलेली आवडत नाही.' इतकी पारंपारिकतेच्या जोखडात अडकलेली स्त्री अजूनही बदलायला तयार नाही.

आज अनेक कायदे सामाजिक कार्यकर्ते, समाजसुधारक, सामाजिक संस्थाचे प्रयत्न होऊनही परिस्थिती बदलेली नाही. समाज कायद्याने नाही तर पारंपारिकतेच्या आधारावर चालतो. ही पारंपारिकता बदलण्यासाठी प्रयत्न होऊनही स्त्रियांच्या समस्या कमी झालेल्या नाहीत. यासाठी या विषयाची निवड केली आहे.

**उद्दिष्ट्ये:**

१. समाजातील स्त्रियांचा विविध काळातील दर्जा अभ्यासणे.
२. लिंगभाव असमानतेची कारणे.
३. लिंगभेदानुसार वर्तमान काळातील स्त्रीचा दर्जा व वस्तुस्थिती.
४. स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचे उपाय शोधणे.

**स्त्रियांचा विविध काळातील सामाजिक दर्जा:**

स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा विचार केल्यास वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळा दर्जा दिसतो.

**१. वैदिक काळ:**

इ.स.पूर्व ६०० चा कालखंड हा वैदिक काळ होता या काळात स्त्रियांचा दर्जा पुरुषांची अर्धांगिनी मानले जात हाते. धार्मिक अधिकार दिले गेले होते.

**२. वेदोत्तर काळ:**

इ.स.पूर्व ६०० नंतरचा काळ. या काळात मनूने 'मनूस्मृती' लिहिली मनूने एकीकडे स्त्रियांना माता, भगिनी व पत्नी म्हणून सन्मान दिला. तर दुसरीकडे 'अबला' म्हणून घोषित केले. स्त्री पुरुषांची गुलाम तिला कोणतेही स्वातंत्र्य नाही अशी मनूने भूमिका घेतली. याच काळात स्त्रिया गुलामगिरीच्या बंधनात अडकून राहिल्या.

**३. संताचा कालखंड:**

हा कालखंड १३०० ते १६०० असा साडेतीनशे वर्षाचा आहे. या काळात उत्तर भारतात कबीर, सूरदास, तुलसीदास तर महाराष्ट्रात नामदेव, तुकाराम या संतानी मोठ्या प्रमाणात धार्मिक प्रबोधन केले. पण संताच्या काळात स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास मदत झाली नाही कारण सर्व स्तरातून संताना विरोध झाला.

**शोभा संभोजी:** समाजशास्त्र विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर (महाराष्ट्र).